

(स्वायत्त) कोल्हापूर
NAAC Accredited "A" with CGPA 3.24 in 3rd cycle.
58th Rank in India Ranking 2017, by NIRF (MHRD)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित,

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# विवेक NEWS

वर्ष : १० | अंक : २० | ऑगस्ट, २०२३ | पाने चार | पान नं. १ | स्वागत मूल्य : १ रुपया



• प्रमुख संपादक
प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार
• सहसंपादक डॉ. प्रदीप पाटील
डॉ. स्वप्निल बुचडे
श्री. सदानंद दुर्गुळे
• सहाय्यक संपादक
गुलनाज पठाण बी. ए. २
प्रणव पाटील बी. ए. २
संग्राम राठोड बी. ए. ३
कोमल पाटील बी. ए. ३
सानिका नाकिल बी. ए. ३
प्रतिक्षा पोवार बी. ए. ३
प्रज्ञा पाटील बी. ए. ३


## प्राचार्या सौ. शुभांगी गावडे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित



कोल्हापूर दि. ७ फेब्रु.: येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी, प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सासवड येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध मान्यवरांचा सत्कार करणेत आला. अध्यक्ष-स्थानी खासदार सुप्रिया सुळे ह्या होत्या. पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचाराचा वसा व वारसा आणि प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मार्गदर्शन घेऊन मी सध्या संस्थेची सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहे. हा पुरस्कार माझ्या एकटीचा नसून आमच्या संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांचा हा बहुमान आहे असे मी समजते, असे प्रतिपादन केले.

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा शैक्षणिक विचार नव्या शैक्षणिक धोरणात उपयुक्त

मा. प्रा. गणेश शिंदे, प्रसिद्ध वक्ते, पुणे




कोल्हापूर दि. ९ जून : उक्तीप्रमाणे कृती करणारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राच्या तळागाळातील बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवली. बापूजींचे आयुष्य समजून घेतल्यास आपलं जीवन समृध्द करता येईल. शिक्षण हे समाजाच्या उन्नतीसाठी असले पाहिजे. मातृत्व भावनेने बापूजींनी गुरुदेव कार्यकर्ते घडविले. शिक्षणाला सामाजिक भान देण्याचे काम बापूजींनी केले आहे. नव्या शैक्षणिक धोरणातील कौशल्या-धारित आणि नाविन्यपूर्ण शिक्षण या गोष्टींना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आपल्या शैक्षणिक दृष्टीकोनात याआधीच स्थान दिलेले आहे. त्यामुळे या शिक्षण संस्थेचे विद्यार्थी देशभरात विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहेत, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा शैक्षणिक विचार नव्या शैक्षणिक धोरणात उपयुक्त असल्याचे प्रतिपादन पुणे येथील सुप्रसिध्द वक्ते प्रा.गणेश शिंदे यांनी केले. ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०५ व्या जयंती प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवीन शैक्षणिक धोरण आणि डॉ. बापूजी साळुंखे या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे हे होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा.नामदेवराव कांबळे, सेक्रेटरी मा.प्राचार्या सौ. शुभांगी गावडे , मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे आणि कोल्हापूर विभागप्रमुख श्री. श्रीराम साळुंखे हे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात बोलताना कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांनी एकविसाव्या शतकातील विद्यार्थी घडविण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील गुरुदेव कार्यकर्ते प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा, विचारांचा वसा आणि वारसा जोपासण्याचे काम सर्वच गुरुदेव कार्यकर्त्यांनी करुन नव्या शैक्षणिक धोरणाला सामोरे जावे, असे प्रतिपादन केले.

## विवेकानंद महोत्सवामुळे मिळाले विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ !



कोल्हापूर, दि.१८ : स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्यांच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२३' चे केलेले आयोजन महत्त्वपूर्ण आहे, असे मत विवेकानंद महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी स्मार्टस ग्लोबल सर्व्हिसचे संचालक मा. रोहित कारगावे यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी, विवेकानंद महोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करीत त्याचे नाविन्य विशद केले. प्रास्ताविक महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, स्टार्टअप, नाविन्यपूर्ण संशोधन, शॉर्ट फिल्म मेकिंग, रील ओ एँड, एकपात्री या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ राज्यातील बहुसंख्य महाविद्यालये सहभागी झाली होती.

## NSS च्या माध्यमातून संस्काराची बीजे रुजतात



मा. कौस्तुभ गावडे, सी.ई.ओ,
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

कोल्हापूर, दि. ११ विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.कौस्तुभ गावडे यांनी NSS च्या स्वयंसेवकांना उद्देशून वरील उद्गार काढले. ते पुढे म्हणाले, स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील युवक हा एन.एस.एस.च्या माध्यमातून घडतो. त्याचबरोबर जीवन जगत असताना अनेकवेळा संघर्ष करावा लागतो. संघर्षाची सुरुवात देखील एन.एस.एस.च्या माध्यमातून करुन जीवनामध्ये यशस्वी होता येते.

अध्यक्षपदावरुन बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, मन, मनगट आणि मेंदू सक्षम करण्यासाठी त्याचबरोबर आपले निश्चित ध्येय साध्य् करण्यासाठी एन.एस.एस. चा उपयोग होतो. विद्यार्थ्यांना स्वत:च्या क्षमता, योग्यता ओळखून व्यक्तीमत्वाचा विकास करता येतो, त्याचबरोबर गावचा विकासही साधता येतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. जी.एस.उबाळे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. राजश्री पाटील यांनी केले.

## विवेकानंदमध्ये ३ रे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन संपन्न



कोल्हापूर: १४, जगण्यासाठी कला महत्त्वाची असते. पुस्तकांबरोबर आपला सभोवताल वाचायला, वेचायला, बुद्धीत साठवायला आणि आठवून विचार करायला शिकल्यास सर्जनशीलता वृद्धिंगत होते. जे साहित्य कुटुंबाशी, समाजाशी आणि माणसाच्या मनाशी भिडतं ते खरे साहित्य होय. जगण्यासाठीचा आनंद वाचनातून मिळतो म्हणून वाचायला हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलसचिव, व सुप्रसिद्ध विज्ञान साहित्यिक, प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमधील वाङ्मय मंडळ आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी, संगणकाच्या दुनियेत आपण वाचनापासून दूर चाललो आहोत. संवेदशीलतेतून काव्याचा जन्म होतो. कथेमध्ये समाजजीवनाचे एक सूत्र गुंफलेले असते. मराठी साहित्यात संतांनी, पंडितांनी व शाहिरांनी लिहिलेल्या साहित्यापासून सुरू झालेली परंपरा आजपर्यंतच्या साहित्यातून आपल्याला विचार करायला प्रवृत्त करते. त्यासाठी आपण सतत वाचत व लिहीत राहायला हवे असे मत मांडले.

यातून समाजाशी असलेली नाळ व्यक्त होते. अशा युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करून विद्यार्थ्यांत सर्जनशील साहित्य लेखनाची प्रेरणा रुजवण्याचे काम या संमेलनाच्या माध्यमातून होत आहे, असे मत मांडले.

## विवेकानंदच्या एन.सी.सी.आजी माजी छात्रांकडून भाविकांना मसाले दूध वाटप



कोल्हापूर दि. ६ : विवेकानंद कॉलेजच्या आजी, माजी एन.सी.सी. छात्रांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री जोतिबा देवाच्या चौथ्या खेट्यासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी १०० लिटर मसाले दूध वाटप करण्यात आले. यामध्ये माजी विद्यार्थी श्री. महेश बेळगावकर, श्री. विजय देसाई, प्रा. विशाल बोंगे, कु. गौतमी पाटील, प्रतिमा हजरे, प्राची जाधव, वैष्णवी पाटील, सेला रेगे, समिधा घुगरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा यांनी केले. सदरच्या कार्यक्रमास कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले .

## संपादकीय...

### पर्यावरण संवर्धन काळाची गरज

आज मानव प्रगतीमुळे पर्यावरण प्रदूषित होत आहे. प्राचीन काळात ऋषीमुनी आपल्या आश्रमाबाहेर अनेक झाडे लावत होते यामुळेच त्यांचे आयुष्य निरोगी राहत होते. आपल्या चारही बाजूंना असलेल्या सुंदर निसर्गात परमेश्वराने एकाहून एक अद्भुत गोष्टी बनवल्या आहेत. सुंदर फुले, हिरवी झाडे, वेगवेगळे रंग आणि रूप असलेले पशुपक्षी इ.गोष्टी आपले मन आकर्षून घेतात. झाडे मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. ती मनुष्य जीवनाची आधार आहेत. याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व भरपूर आहे. पर्यावरण म्हणजे सर्व सजीवांच्या जीवनावर परिणाम करणारी परिस्थिती. परंतु आज मानवाने आपल्या नवनवीन शोधांच्या अभिलाषेमुळे पर्यावरणाला नुकसान पोहोचवणे सुरू केले आहे. अशा काळात पर्यावरण संवर्धनही काळाची गरज झाली आहे. पृथ्वीवरील अनेक प्राणी आपल्या अन्नासाठी वृक्षांवर अवलंबून असतात. मनुष्य हवेत असलेला ऑक्सिजन हा श्वसनाद्वारे गृहन करतो. म्हणून वृक्ष मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

पर्यावरणाचा ऱ्हास वेळीच रोखण्यात आला नाही तर येत्या काळातही खूप मोठी समस्या बनून जाईल. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून जगभरातील देश वृक्ष लागवड व जास्तीत जास्त सीएनजी गॅसचा उपयोग करू लागले आहेत. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल. पर्यावरणाला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सर्वात आधी जलप्रदूषणाला रोखावे लागेल. कारखान्यांचे खराब पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यांमधून वाहणारा मल इत्यादी समुद्रात जाण्यापासून रोखले गेले पाहिजे.

कारखान्यातून निघणारे रासानिक दुषित पाणी नद्यामध्ये मिसळून जलचर प्राण्यांचा मृत्यू होत आहे. दुसरीकडे त्याच प्रदूषित पाण्याला शेतात वापरले जाते व दूषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन आपलं आरोग्य बिघडवण्याचा धोका असतो. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, आपले आयुष्य आरोग्यदायक बनवायचं आहे तर आजपासून प्रयत्न करायला हवे. जलप्रदूषण, वायूप्रदूषणाने पर्यावरणाला खूप हानी पोहोचवली आहे. मोठमोठ्या कारखान्याचे चिमण्यांमधून निघणारे धूर रेल्वे व इतर पेट्रोल डिझेल वर चालणारी वाहनांमधून निघणारा धूर वायूमंडळात मिसळून वातावरण प्रदूषित करतो. याशिवाय ध्वनी प्रदूषणाची समस्या ही मोठ्या प्रमाणात आहे. आज लग्न तसेच इतर समारंभात मोठमोठ्या आवाजात गाणे वाजवली जातात ज्यामुळे ध्वनी प्रदूषण होऊन बहिरेपणा व डोकेदुखी समस्या निर्माण होतात. मानव इतर सजीवांपेक्षा बुद्धिमान असला तरी तोसुद्धा पर्यावरणाचा एक घटक आहे हे विसरता कामा नये. नैसर्गिक पर्यावरणात बदल घडवण्याची क्षमता केवळ मानवाकडे आहे. त्यामुळे पर्यावरणातील प्रत्येक घटकांचे संरक्षण करणे, त्याचा काळजीपूर्वक वापर करणे हे आपण मानवाचे आद्य कर्तव्य आहे हे आपण ओळखले पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण म्हणून प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करावे व इतरांनाही प्रोत्साहित करावे. पर्यावरण वाचवा! जीवन वाचवा! देश वाचवा! या उक्तीप्रमाणे पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज झाली आहे.

कु. सुरेखा अशोक लाखे, बी. ए. भाग १

# पर्यावरणाच्या संवर्धनाची सुरुवात आजच !

पर्यावरण संवर्धन हा एक विस्तृत विषय आहे. ज्याच्या अंतर्गत अनेक उपविषय आहेत. ज्यावर चर्चा केली जाऊ शकते. प्रदूषण, जंगलतोड, वन्यजीव संवर्धन, नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन इत्यादींबद्दल आपणा सर्वांना माहिती आहे. शाळेच्या दिवसापासून आपण त्याबद्दल शिकत आलो आहोत, पण पर्यावरणाचे संवर्धन कसे करायचे याचा कधी विचार केला आहे का? माणसाची मानसिकता निसर्गाबाबत इतकी खालावली आहे की, भविष्यात खूप गंभीर समस्येला सामोरे जावे लागणार आहे. पण आज मी माझे मत मांडू इच्छिते, ज्याची पृथ्वीवर प्रत्येक माणसाने सवय केली पाहिजे.

सोप्या शब्दात सांगायचे तर, संवर्धन आणि जतन करण्याची सुरुवात तुमच्या आणि माझ्यापासून व्हायला हवी, ज्यामुळे पुढे पर्यावरण संवर्धनासाठी 'आम्ही' ही संज्ञा आकाराला येईल.

पण हे कसे शक्य होईल? पृथ्वी हे आपले घर आहे अशी आपली मानसिकता निर्माण करण्यापासून याची सुरुवात व्हायला हवी. ती मानसिकता आपणच जतन केली पाहिजे, नाहीतर उद्या अशी परिस्थिती निर्माण होईल की संसाधनांच्या कमतरतेसाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करू. हे एका उदाहरणासह स्पष्ट करता येईल. कल्पना करा की, तुम्ही ऑक्सिजन असलेल्या पिशवीला जोडलेला मुखवटा घातला आहे. कल्पना करा की, लोक जेवणासाठी गोळ्या घेतात कारण अन्नाची कमतरता आहे. आजच उपाययोजना केल्या नाहीत तर एक दिवस वास्तवात येणारे हे भविष्यातील अंदाज आहेत असेच म्हणावे लागेल.

पण आम्ही अजूनही भाग्यवान आहोत आणि आम्हाला काम करण्याची आणि आमचे वातावरण सुधारण्याची संधी आहे. इथे ३ मूलभूत आणि सोप्या गोष्टी आहेत ज्या प्रत्येक तरुणाने पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी केल्या पाहिजेत. प्रथम, आपण REDUSE, REUSE आणि RECYCLE या संकल्पनांचा सराव केला पाहिजे.

१) चिप्स किंवा चॉकलेटची पाकिटे डस्टबिनमध्ये फेकून द्या. प्लास्टिकचा वापर कमी करा.

२) वस्तूंचा पुनर्वापर करा, वस्तू आणि कपडे फेकण्याऐवजी अनाथाश्रम किंवा स्वयंसेवी संस्थांना दान करा आणि पुन्हा वापरता येण्याजोग्या कापडी पिशव्या वापरा.

३) वापरलेल्या शीतपेयाच्या बाटल्या, एकदा वापरलेल्या पेन इत्यादींचा पुनर्वापर करा.

- प्रतिक्षा पोवार, बी.ए.३

## विवेकानंदमध्ये 'भारतीय लोकशाही : काल, आज आणि उद्या' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न




कोल्हापूर दि.२५: सन १८१८ साली इंग्रजांच्या आगमनाबरोबर भारतात लोकशाहीची संकल्पना अस्तित्वात आली. १८१८ ते १९९० पर्यंत 'आयडिया ऑफ इंडिया' ही संकल्पना अस्तित्वात होती, परंतु ९० नंतर 'आयडिया ऑफ न्यू इंडिया' ही संकल्पना अस्तित्वात आलेली आहे. १९१८ पर्यंतच्या भारतीय लोकशाहीमध्ये महिलांना, सर्व-सामान्यांना संधी नव्हती, १९१८ पर्यंतची भारतीय लोकशाही ही अभिजनांची होती. महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय लोकशाहीला नवे आयाम प्राप्त करून दिले. त्यानंतर महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय लोकशाहीला बळकट बनविले. १९९५ नंतर भारतीय लोकशाहीमध्ये जातीपातीच्या राजकारणाचा शिरकाव झाला. १९७० पर्यंतची भारतीय लोकशाही ही माणसाला माणूस म्हणून घडविणारी होती, परंतु आजची भारतीय लोकशाही ही माणसाला स्पर्धक बनविणारी आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी आपल्या बीजभाषणात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी जगामध्ये भारतीय लोकशाहीला महत्त्वाचे स्थान आहे. प्रातिनिधिक लोकशाही, निर्वाचनात्मक लोकशाही, बहुमताची लोकशाही, आर्थिक लोकशाही अशा अनेक संकल्पनांच्या एकत्रीकरणातून आजची लोकशाही संकल्पना उदयास आली आहे. लोकशिक्षण हे लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी आवश्यक आहे. ही लोकशाही समाजापर्यंत पोहोचली पाहिजे, असे मत मांडले.

या राष्ट्रीय चर्चासत्रातील पहिल्या सत्रात ज्येष्ठ संपादक मा. वसंत भोसले यांनी 'प्रसारमाध्यमे आणि लोकशाही' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आणि यशदा, पुणे चे मानद व्याख्याते मा. भारत (आप्पा) पाटील यांनी 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि भारतीय लोकशाही' या विषयावर आपली भूमिका मांडली. तिसऱ्या सत्रात सहभागी शोधनिबंध वाचकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

**मानवाने प्रगती केली. अनेकविध क्षेत्रामध्ये गगनभरारी घेतली. मात्र हे सर्व होत असताना मात्र पर्यावरणाच्या संवर्धनाची काळजी घ्यायला हवी होती ती मात्र घेतली गेली नाही. 'पर्यावरणाचे संवर्धन काळाची गरज'**

### परमेश्वराने एकाहून एक अद्भुत गोष्टी बनवल्या



ऐश्वर्या गवसे
बी. ए. भाग ३

आपल्या चारही बाजूंना असलेल्या निसर्गातील अनेक अद्भुत गोष्टी आपले मन प्रफुल्लित करतात. मानवी जीवनात झाडांचे महत्त्व विशेष आहे. ती मनुष्य जीवनाची आधार आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व आहे. आज माणसे आपल्या अभिलाषेमुळे पर्यावरणाला नुकसान पोहोचवत आहेत. अशावेळी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज झाली आहे. अनेक प्राणी, मनुष्य वृक्षांवर अवलंबून आहेत.

### पाणी प्रदूषण रोखायला हवे !



मृणालिनी कांबळे
बी. ए. ३

पर्यावरणाला प्रदूषणापासुन वाचवण्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याला पर्यावरण संवर्धन असे म्हणतात. इंटरनेट, मोबाईल यांच्या अतोनात वापरामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे, नासधूस होत आहे. वायू प्रदूषण, जलप्रदूषण, मृदा प्रदूषण असेच जर चालू राहिले तर एके दिवशी पर्यावरणाचा ऱ्हास होईल. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे रोगराई वाढली आहे. त्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे.

### आरोग्यदायी जीवनासाठी पर्यावरण संवर्धन !



रुहाना देसाई
बी. ए. १

पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व जाणून जगभरात वृक्षलागवड व सीएनजी गॅसचा वापर वाढत आहे. पर्यावरण संरक्षणासाठी वेळीच लक्ष द्यावे लागेल. यासाठी सर्वात आधी जलप्रदूषण रोखावे लागेल. कारखान्यांचे पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यांमधून वाहणारा मल समुद्रात, नदीत मिसळण्यापासून रोखले पाहिजे. कारखान्यातून निघणारे दुषित पाणी नदीत गेल्याने प्राण्यांचे मृत्यू होत आहे. दूषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन मानवी आरोग्य बिघडवण्याचा धोका निर्माण झाला आहे.

### निसर्ग सुंदर आहे !



प्रतिक्षा पोवार
बी. ए. भाग ३

प्रत्येकाला निसर्गाच्या सानिध्यात वेळ व्यतीत करायला नेहमी आवडत असते. निसर्गरम्य ठिकाणी भेटी देऊन सुंदरतेचा आनंद घ्यायला आवडते. हिरवीगार झाडे निसर्गाची शोभा वाढवत असतात. वृक्ष आपल्याला असंख्य गोष्टी प्रदान करतात. हे वृक्ष वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. वृक्ष खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पाऊस पडण्यासाठी झाडे पोषक वातावरण निर्माण करतात.

### पर्यावरणाचे संतुलन राखणे आपल्या हाती आहे.



अभिषेक मछले
बी. ए. भाग २

पृथ्वीवर असणाऱ्या सर्व घटकांचा मानवी जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या परिणाम होतो. आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता ही पूर्णपणे पर्यावरणातून होत असते. तरीही आपण पर्यावरण संवर्धनाकरिता कोणताच प्रयत्न करत नाही. याउलट उपलब्ध घटकांचा वापर आपण हव्यासापोटी करून पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणावर बिघडवत आहोत. त्याबाबत वेळी जागरूकता न झाल्यास येणाऱ्या काळात गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल.

### पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती आवश्यक !



वैभवी घाटगे
बी. ए. २

जलप्रदूषण, वायुप्रदूषणाने पर्यावरणाला खूप हानी पोहोचत आहे. मोठमोठ्या कारखान्यांमधून निघणारे धूर, रेल्वे व पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमधून निघणारा धूर वायूमंडळात मिसळून वातावरण प्रदूषित करतो. याशिवाय ध्वनी प्रदूषणाची समस्याही मोठ्या प्रमाणात आहे. ध्वनी प्रदूषण होऊन बहिरेपणा व डोकेदुखी या समस्या निर्माण होतात. जगभरात ५ जूनला विश्व पर्यावरण दिवस साजरा केला जातो. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी महत्त्वाची माहिती व सेमिनार आयोजित केले जातात.

### मानवी अस्तित्वासाठी जैवविविधतेचे जतन



कात्यायनी लिंगम
बी. ए. भाग २

जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. निसर्ग हे मानवासह वन्यजीव, जलचर, प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांना लाभलेलं मोठं वरदान आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी आधी आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे. ही आजच्या काळाची महत्त्वाची गरज बनली आहे.

### झाडे लावा, झाडे जगवा !



मैथिली आडनाईक
बी.ए. भाग १

निसर्ग 'माझा मित्र' हे म्हणताना खुप छान वाटते ना? पण प्रत्यक्षात कधी एक क्षण त्याच्यासोबत घालवतो का? ज्याच्यामुळे आपण मोकळा श्वास घेतो, त्याचा विचार करतो का? निसर्गाला त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करुया. झाडे तोडणे, जंगले उद्ध्वस्त करणे यास कठोर शिक्षा मिळावी. झाडे लावा, झाडे जगवा हा उपक्रम राबयला हवाच. तरच प्रदूषण, भुंकप, महापूर ह्या सर्व समस्यांपासून आपण वाचू शकतो.

### पर्यावरणाच्या हानीला जबाबदार कोण?



सानिका पाटील
बी. ए. ३

काही वर्षांमध्ये कारखान्यांची संख्या वाढली आहे. कारखान्यात लागणारा कच्चामाल तसेच देशातील वाढती लोकसंख्या अशा अनेक गोष्टी वृक्षतोडीसाठी कारणीभूत आहेत. जगभरात ५ जूनला विश्व पर्यावरण दिवस साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येक देशात पर्यावरणाच्या संवर्धनासाठी महत्त्वाची माहिती दिली जाते. अशा पद्धतीने आपणही पर्यावरण संरक्षणात योगदान देऊन संपूर्ण मानवी जीवनाच्या कल्याणाची प्रतिज्ञा करूयात.

* मार्गदर्शक : मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, * प्रकाशक व प्रमुख संपादक : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, * सहसंपादक : डॉ. प्रदीप पाटील, डॉ. स्वप्निल बुचडे, श्री. सदानंद दुर्गुळे * सहाय्यक संपादक : गुलनाज पठाण बी.ए.-२, प्रणव पाटील बी.ए.-२, संग्राम राठोड बी.ए.-३, कोमल पाटील बी.ए.-३, सानिका नाकिल बी.ए.-३, प्रतिक्षा पोवार बी.ए.-३, प्रज्ञा पाटील बी.ए.-३ * मुरारी प्रिंटींग सर्व्हिसेस, कोल्हापूर येथे छापून विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून प्रसिद्ध केले. * फोन :(०२३१)२५४३४०२. * या अंकात छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशन सहमत असतीलच असे नाही. (फक्त खाजगी वितरणासाठी)

# समता आणि बंधुता हीच आधुनिक जीवनमूल्ये

कोल्हापूर: १५ : आदिवासी व मागास समाज दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहात असतात. त्यामुळे आदिवासी व मागास विकास विभागाची शैक्षणिक गंगा तळागाळापर्यंत पोहोचली नाही. आदिवासी व मागास समाजाच्या विविध बोली, भाषा, परंपरा, चालीरीती, संस्कृती आजही टिकून आहेत. त्याठिकाणी वैचारिक व सांस्कृतिक देवाणघेवाण झाली पाहिजे. राज्यकर्त्यांनी आदिवासी व मागास समाजाच्या विकासासाठी धारिष्ट वाढविणे गरजेचे आहे. आदिवासी व मागास समाजातील मुलांचे आरोग्य त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुलींची सुरक्षितता, मुलींचे होणारे लैंगिक शोषण यासंबंधी आवाज उठविणे आवश्यक आहे. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी मागास

डॉ. ए. सी. मोहापात्रा, नॉर्थ-ईस्टर्न हिली युनिव्हर्सिटी, शिलाँग, मेघालय.



समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कोल्हापूर संस्थानात अभिनव निर्णय घेतले. त्यांचा वारसा स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून चालवला. बापूजींनी आदिवासी भागात शिक्षणाची गंगा पोहोचवली. त्यामुळे आदिवासी व बहुजन समाजाचे जीवनमान उंचावले. असे मत मांडले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. यावेळी आय.क्यू.ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी या उपस्थित होत्या.

पहिल्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. रवींद्र जायभाये यांनी तर दुसऱ्या सत्रात डॉ. मौशुमी दत्ता यांनी मनोगत व्यक्त केले.

चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाचे माजी विभागप्रमुख, प्रा. डॉ. के. सी. रमोत्रा, सहाव्या सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिंदे तर सातव्या सत्रात प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी विषयाची मांडणी केली.

# विवेकानंदमध्ये 'साहित्य में आदिवासी और पर्यावरण विमर्श' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर: ११, देशामध्ये आदिवासी समुदायाने जल, जमीन आणि जंगल यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे काम केले. आदिवासी समाज वर्षानुवर्षे शाश्वत विकासापासून वंचित आहे. त्यामुळे त्यांचा सातत्याने शाश्वत विकास व्हायला हवा. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी साहित्यिकांनी साहित्यातून मांडणी करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अशोक पवार यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य साळुंखे यांनी वसुंधरेच्या संवर्धनाची गरज असून ते काम आदिवासी चांगल्या प्रकारे करत असतात. स्वराज्याचे सुराज्य होण्यासाठी शिक्षणाची कास धरली पाहिजे हे ओळखून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आदिवासी पाड्यापर्यंत शिक्षण पोहोचवले, असे मत





मांडले.

सदर चर्चासत्राचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. याप्रसंगी आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी मान्यवरांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. यावेळी शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनील बनसोडे, प्रा. डॉ. नजीम शेख, प्रा. मारुख मुजावर, प्रा. डॉ. प्रकाश चिकोर्डेकर, प्रा. डॉ. सातप्पा सावंत उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात रोपट्यास पाणी घालून, प्रतिमा पूजन व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी केले. आभार डॉ. दीपक तुपे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. निलेश जाधव यांनी केले.

# इंग्रजी संभाषणातून व्यक्तिमत्त्व प्रभावी बनते.

- प्राचार्य डॉ. एन.व्ही.नलवडे




कोल्हापूर, दि. ०५ : योग्य व्याकरणाचा अट्टाहास धरून बोलणे सोडू नका. बोलायला सुरुवात करा. मराठीत विचार करून त्याचे इंग्रजीत भाषांतर करू नका. भाषा शिकण्यापेक्षा ती आत्मसात करणे जास्त फायदेशीर ठरते. त्यासाठी इंग्रजी सिनेमे पाहणे, इंग्रजी वर्तमान पत्र वाचणे अशा गोष्टी उपयोगी ठरतात, असे मत माजी प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजच्या इंग्रजी विभागातर्फे आयोजित 'इंग्लिश वीक'च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. करीअरचे क्षेत्र वाढवण्यासाठी आणि त्याला एका उंचीवर नेण्यासाठी इंग्रजी भाषेतील संवाद कौशल्य उपयोगी पडते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. हर्षदा काळे हिने केले तर प्रमुख पाहुण्यांची ओळख कु. शाहीन पठाण हिने करून दिली. कु. आयुब काझी याने आभार मानले तर सूत्रसंचालन कु. प्रियदर्शिनी सरनोबत आणि कु. जुवेरीया कुडचीकर यांनी केले.

# विद्यार्थ्यांची भेंडाई धनगरवाड्यास अभ्यासभेट

कोल्हापूर दि. १६: येथील विवेकानंद महाविद्यालयातील समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल व मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी पन्हाळा व करवीर तालुक्यातील भेंडाई या धनगरवाड्यास अभ्यासभेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी येथील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भौगोलिक व भाषिक परिस्थितीचा अभ्यास केला. या अभ्यासभेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

विकास निर्देशांकात अव्वल स्थानी असणाऱ्या कोल्हापूर शहरापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर असणारा भेंडाई हा धनगरवाडा अजूनही भौतिक सुविधांपासून वंचित आहे. रस्त्याअभावी बाळंतपण व इतर आजारपणात ४ महिलांचा मृत्यू झाला. या परिस्थितीला जबाबदार कोण? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. तसेच इयत्ता ४ थीच्या पुढे शाळा नसल्याने विद्यार्थी शाळाबाह्य होत आहेत. मोबाईल व मनोरंजनाच्या कोणत्याही सोई उपलब्ध नसल्याने आधुनिक जगापासून ते खूप दूर आहेत. तरीही जगण्याची प्रचंड उर्मी त्यांच्या मनामध्ये आहे. अशा स्वरूपाचा अभिप्राय अभ्यासभेटीत विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने इथल्या विद्यार्थ्यांना वह्या, पेन व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. तर शाळेसाठी कथा, कविता, गोष्टी, सुधारकांची विचार सांगणारी ६५ पुस्तके देण्यात आली. यावेळी भेंडाई ग्रामस्थांनी आपली सांस्कृतिक ओळख सांगणारे गजनृत्य तसेच महिलांनी त्यांच्या पारंपरिक ओव्या सादर केल्या.

यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. दत्ता जाधव, डॉ. सुनील भोसले, डॉ. स्वप्निल बुचडे, प्रा. डॉ. दादासाहेब घाडगे, प्रा. अजय पाटील व १८ विद्यार्थी उपस्थित होते.

# विवेकानंद कॉलेजमध्ये लोकनियुक्त सरपंचांची विद्यार्थ्यांनी घेतली मुलाखत



कोल्हापूर, दि. २१ : येथील विवेकानंद कॉलेज येथे चंद्रे (ता. राधानगरी) गावाचे सरपंच श्री. प्रभाकर पाटील आणि फराकटेवाडी (ता. कागल) गावाच्या सरपंच सौ. शीतल फराकटे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित करण्यात आला. ही मुलाखत बी. ए. भाग १ च्या विद्यार्थिनी कु. प्रतिज्ञा पालकर आणि कु. श्रेया मांडेकर यांनी घेतली. राजकारणाकडे एक भ्रष्ट आणि गुन्हेगारीचे क्षेत्र म्हणून बघितले जाते. पण हे पूर्णतः खरे नाही. राजकारणातून लोकसेवेची, लोकांची आयुष्ये बदलण्याची संधी मिळते. आपण सरकारी नोकर होण्यापेक्षा राज्यकर्ते होण्याचे स्वप्न का बघू नये?' असे फराकटेवाडी गावाच्या सरपंच सौ. शीतल फराकटे यांनी विद्यार्थ्यांना विचारले.

'कुठल्याही परिस्थितीत हार न मानता, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडत विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक राहिले पाहिजे' असा सल्ला चंद्रे गावाचे लोकनियुक्त सरपंच श्री. प्रभाकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. गावामधील विकासकामे, निधीचे स्रोत, महिलांचा राजकारणातील सहभाग, महिला सक्षमीकरण इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर या मुलाखतीत प्रकाश टाकला गेला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी भूषविले. आयक्युएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, महाविद्यालयातील प्राध्यापक या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. या कार्यक्रमाचे संयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख कु. समीक्षा फराकटे, श्री. दत्ता जाधव, श्री. अजय पाटील यांनी केले.

# विवेकानंदमध्ये उच्च शिक्षण आणि संशोधनात ग्रंथालयाचे स्थान व महत्त्व या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा



कोल्हापूर दि.०१ : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत ग्रंथालयामार्फत उच्च शिक्षण आणि संशोधनात ग्रंथालयाचे स्थान व महत्त्व' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.डी .बी. सुतार यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते. डॉ. आर. आर. कुंभार यांनी मनोगत व्यक्त करताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि ग्रंथालये याबाबत माहिती दिली. डॉ. डी. बी. सुतार यांनी ग्रंथालये आणि संशोधन, डिजिटल ग्रंथालय याविषयी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात श्री अतुल नगरकर ग्रंथपाल दूध साखर महाविद्यालय बिद्री यांनी ई- संसाधनाचा वापर व फायदे, स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ई-संसाधने, कोहा सॉफ्टवेअर तसेच तिसऱ्या सत्रात डॉ. पांडुरंग पाटील ग्रंथपाल श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय दसरा चौक कोल्हापूर यांनी संशोधनाचे टप्पे व कार्यपद्धती या विषयावर मार्गदर्शन केले.
ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले .श्री दत्ता जाधव व श्री सुरज कुंभार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहाय्यक ग्रंथपाल श्री हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले, जुहेरीया कुडचीकर व अपूर्वा स्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.

# विवेकानंद कॉलेजमध्ये रोजगारक्षमता विकास प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन




कोल्हापूर दि. २१: रोजगार-क्षमता विकास प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल विभागामार्फत करण्यात आले. दिनांक १६ ते १८ मार्च, २०२३ च्या दरम्यान दररोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी महाविद्यालयातील विविध विद्याशाखांतून एकूण ८० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

महिंद्रा प्राईड क्लासरूमच्या केंद्रीय प्रमुख सौ. सीमा भागवत, राज्य समन्वयक श्री. पंकज दांडगे यांच्या समन्वयाने कु. चिन्मय अभंगराव व कु. शफ़ाक हसन यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबीर पार पडले. या प्रशिक्षण शिबीरामध्ये मुलाखत कौशल्य मुलाखतीची तयारी, संभाषण कौशल्य गट चर्चा करणे, सहकार्य कौशल्य, देहबोली विकास, समस्या सोडविण्याचे कौशल्य, व्यावसायिक नैतिकता, जीवनावश्यक कौशल्ये इत्यादी गोष्टींचा उहापोह होता.

या शिबिरासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## विवेकानंदमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रम संपन्न



कोल्हापूर: २१, येथील विवेकांनद कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि इंटरनॅशनल अफेअर्स सेल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑसम ब्रॉड- कनेक्टिव्हिटी हा कार्यक्रम संपन् झाला. यामध्ये सांस्कृतिक आदानप्रदान करण्यासाठी नेपाळ, बांग्लादेश, इथोओपिया, सुदान, अफगाणिस्तान, मंगोलीया या देशातील शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १३ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, शैक्षणिक वाटचाल व काही आव्हाने याबाबत दिलखुलास चर्चा केली. तसेच या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी आपापल्या देशातील संस्कृतीचे नृत्य, गायन, विविध कलाप्रकाराव्दारे दर्शन घडविले.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्व्यक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, सर्वच विद्यार्थ्यांनी वांशिक, धार्मिक या वादात न अडकता सर्वांना सामावून घेऊन माणुसपण जपले पाहिजे.

प्रमुख पाहुणे डॉ. एस. बी. सादळे, संचालक इंटरनॅशनल अफेअर्स सेल, शिवाजी विद्या., कोल्हापूर आपल्या भाषणात ते म्हणाले, या कार्यक्रमाचा मुख्य् उद्देश आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांबदल सहकार्याचा भाव जपणे हाच आहे. विवेकानंद कॉलेजने हा एक आगळा वेगळा उपक्रम राबविल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करणेत आले होते.

## इलेक्ट्रॉनिक्समधील नाविन्यपूर्ण कल्पना आणि अंमलबजावणी या विषयावर व्याख्यान संपन्न



कोल्हापूर २५ : प्रमुख व्याख्याते निवृत्त प्रा.आर.एस. देशमुख, एस.जी.एम. कॉलेज, कराड यांनी इलेक्ट्रॉनिक्स् विषयातील विविध पैलूंचा वापर विविध क्षेत्रात कसा करता येईल. यावर प्रात्यक्षिकांच्या आधारे मार्गदर्शन केले. अल्ट्राव्हायलेट किरणांचा किटकनाशक म्हणून वापर अल्ट्रासोनिक फ्रिक्वेन्सीच्या वापराने हवेतील आर्द्रतेचे नियमन, म्युच्युअल इंडक्टन्सच्या साहाय्याने शेती संरक्षणासाठीचे विद्युत कुंपण, इडी करंटचा वापर उष्णता निर्माण करणाऱ्या उपकरणामध्ये कसा केला जातो. इ. बाबींवर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इलेक्ट्रॉनिक्स् विभागप्रमुख डॉ. सी.बी.पाटील होते. कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स् विभागाने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एन. पी. मोटे यांनी केले तर आभार प्रा.पी. आर. बागडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले.

## विवेकानंदमध्ये मराठी भाषा गौरव दिनी काव्यवाचन संपन्न

कोल्हापूर दि.२७ : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये, कवी कुसुमाग्रज यांची जयंती मराठी राजभाषा दिन म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील उपस्थित होते. मराठी विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या वतीने मराठी राजभाषा दिन कार्यक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्या स्वरचित काव्यवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यासंगी रेडिओ सिटी यांनी आयोजित केलेल्या 'माझी बोली माझा बाणा' या उपक्रमांतर्गत घेतलेल्या स्वरचित काव्यवाचना-मध्ये ऋतुजा व्हरांबळे आणि साक्षी कोळी या विद्यार्थिनींनी वाचलेल्या कवितांना उत्कृष्ट कविता लेखनाचा व वाचनाचा पुरस्कार देऊन सिटी रेडिओ यांच्याकडून सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतात प्रा. किरण पाटील म्हणाले, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मनाला तंदुरुस्ती-साठी सर्जनशील लेखन करायला हवे. काव्यलेखनातून मनाचा हुंकार बाहेर पडतो. याप्रसंगी प्रा. संदिप पाटील, डॉ. आरिफ महात, रेडियो सिटी ९५ चे आर. जे. शीतल, आर. जे. मिलिंद यांनीही काव्यवाचन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले, आभार प्रा. नम्रता ढाले यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्वप्निल बुचडे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात रोपट्याला पाणी घालून व संस्था प्रार्थनेने झाली. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'एक हात मदतीचा' उपक्रम साजरा



कोल्हापूर २७ : समाजशास्त्र विभागाच्या वतीने एक हात मदतीचा हा उपक्रम राबवण्यात आला. शहरातील विविध भागातील गरजू, निराधार लोकांना एकवेळचे जेवण मिळावे या हेतूने हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्थानक, कॉमर्स कॉलेज जवळील दत्तमंदीर, वटेश्वर मंदिर या ठिकाणी गरजू आणि निराधार लोकांना अन्नदान करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार तसेच आय. क्यू. एस. सी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या सहकार्य आणि संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी समाजशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापक एच. व्ही. चामे, प्रा. आर्या पाटील, डॉ. दादासाहेब घाडगे तसेच समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संभाषण व्याकरणापेक्षा जास्त महत्त्वाचे - प्रा. डी. श्रीधर गोखले, पुणे



को. दि. ३ : व्याकरणाचा बाऊ न करता विद्यार्थ्यांना बोलते करणे जास्त महत्त्वाचे आहे. ते चुका करतील. त्या सगळ्या चुका त्यांच्या निदर्शनास आणून देण्याची गरज नाही. महत्त्वाच्या चुका त्यांच्या लक्षात आणून द्या. याला 'निवडक सुधारणा' असे म्हणतात. ओघवतं बोलणं म्हणजे वेगात बोलणं नव्हे तर योग्य ठिकाणी थांबून समोरच्याला समजेल असं बोलणं. असे मत प्रसिद्ध इंग्रजी भाषातज्ज्ञ प्रा. डॉ. श्रीधर गोखले यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजच्या इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या इंग्रजी संभाषणासाठी व्याकरण या विषयावर आधारित कार्यशाळेत ते बोलत होते

आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषा कौशल्य वाढवण्यासाठी कॉलेज प्रयत्न करत राहील असे आश्वासनही दिले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी केले तर कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. कार्यशाळेस प्रा. सुप्रिया पाटील, डॉ. सलमा मणेर, प्रा. माधुरी पवार आणि इतर प्राध्यापक

## मानवता हीच साहित्याची शिकवण - प्रा. हंबीरराव चौगुले




कोल्हापूर, दि. १० : साहित्य माणसास माणूसपण देते, सत्यम्, शिवम्, सुंदरमचा संदेश देते, पण आजचे साहित्य हे माणसाच्या सुख-दुःख, समस्या-वेदना मांडते. साहित्य समाजाला जीवन जगण्याचा मार्ग शिकवते. असे मत मालवण येथील एस. के. पाटील सिंधुदूर्ग महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. हंबिरराव चौगुले यांनी व्यक्त केले. ते विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्या वतीने शुक्रवार, दि. १० फेब्रुवारी, २०२३ रोजी हिंदी साहित्य आणि मानवी मूल्य या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले की, साहित्य हे नेहमी वाचले पाहिजे कारण साहित्यातून मानवी मूल्यांची शिकवण मिळते. तसेच समाजात कसे वागावे याची नैतिक शिकवण मिळते. साहित्य माणसाचे मनोरंजन करते, जीवन जगण्याचा मार्ग शिकवते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आरिफ महात यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. दीपक तुपे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. सानिया हुदली हीने करुन दिला. कु. वैष्णवी चौगुले हीने आभार मानले.

## कर्तबगार स्त्रियांच्या योगदानाबद्दल आपण सदैव नतमस्तक झाले पाहिजे - डॉ. भारती पाटील





कोल्हापूर दि. ८ : अंतर्गत तक्रार समिती आणि सचेतना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. भारती पाटील बोलताना म्हणाल्या, भारतात प्राचीन आणि पौरात्य काळातील कर्तबगार स्त्रियांनी आपल्या बुद्धीच्या जोरावर आपापला काळ गाजवला, तसेच अनेक संघर्षांना त्यांना सामोरे जावे लागले. काकतीय अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, कल्पना चावला, सुनीता विल्यम अशा काही इतिहासातील आणि आधुनिक कर्तबगार महिलांचा आदर्श आपण ठेवला पाहिजे. लोकशाहीमध्ये स्त्री पुरुष असा फरक न ठेवता सर्वांना त्यांच्या कृती आणि क्षमतेनुसार संधी मिळाली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विद्यार्थी विद्यार्थिनींनी इतिहासातील स्त्रियांच्याकडून प्रेरणा घेऊन स्वतःची कर्तबगारी व कर्तृत्व गाजवावे आणि इतिहास घडवावा तसेच शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील पुरुषांना भान आले पाहिजे आणि स्त्रियांवरती टीकाटिपणी होऊ नये, असे मनोगत मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार समितीच्या प्रमुख डॉ. उर्मिला खोत यांनी केले प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. सुनीता शिर्के यांनी करून दिली आभार प्रा. शिल्पा भोसले यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे यांनी केले.

## विवेकानंद कॉलेजच्या ऐश्वर्या पोवारला नेमबाजीमध्ये सुवर्ण पदक



कोल्हापूर दि. : मध्य प्रदेश (भोपाळ) येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्स् २०२३ स्पर्धेत विवेकानंद कॉलेजची ऐश्वर्या मुरलीधर पोवार हिने सुवर्ण पदक पटाकवले. तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करताना १० मीटर एअर रायफल मिक्स् इव्हेंटमध्ये सुवर्ण पदकाची कमाई केली. सदर विद्यार्थिनीस श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब, संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सी. इ. ओ. मा. कौस्तुभ गावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर.कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले.